बुधवार दि. २ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ०२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो. प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या वर्गखोल्या, स्वच्छतागृह आदींच्या सद्यस्थितीचा अहवाल सात दिवसात द्या - पालकमंत्री पंकजा मुंडे

### शाळा दुरुस्तीचा निधी अखर्चित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश

**मुंबई - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, कंपाऊंड वॉल आदींची सद्यः स्थितीबाबत पाहणी करून येत्या सात तारखेपर्यंत अहवाल देण्याचे निर्देश पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिल्या. तसेच जालना जिल्ह्यातील शैक्षणिक सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी आदर्श शाळा, अंगणवाडी, आधुनिक ग्रंथालये आणि क्रीडांगणांच्या विकासाचा सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.



जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वर्गखोल्यांची दुरुस्ती तसेच नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाबाबत तसेच जालनाई सिल्क ब्रँडिंगबाबत पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी आज मंत्रालयीन दालनातून आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, जालना महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा उपस्थित होते. तर जिल्हापरिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे यांच्यासह इतर अधिकारी हे दृरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. श्रीमती मुंडे यांनी जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, जुन्या वर्गखोल्यांची दुरुस्ती, मुला-मुलींसाठीची शौचालयाची स्थिती, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदींचा आढावा घेतला.

जिल्हा परिषदेच्या शाळा, अंगणवाडी आणि ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींची सद्यस्थिती, आवश्यक दुरुस्ती, उपलब्ध निधी आणि प्रलंबित कामे यांचा आढावा घेण्यात यावा. निधी मंजूर असूनही निविदा प्रक्रिया अथवा प्रशासकीय कार्यवाही वेळेत पूर्ण न झाल्याने निधी अखर्चित राहणे स्वीकारले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही श्रीमती मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच पुढील काही दिवसात जिल्ह्यातील अंगणवाडी व ग्रामपंचायत इमारतींचा आढावा घेण्यात येणार असून यासंदर्भातील अहवाल तयार करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यात शाळांच्या डिजिटलायझेशन, आदर्श शाळा उपक्रमासाठी निधी उपलब्ध आहे. या निधीतून अस्तित्वातील अधिकाधिक शाळांचा दर्जा सुधारण्यावर भर द्यावा. रंगरंगोटी, आवश्यक दुरुस्ती, बालस्नेही सजावट, डिजिटल वर्गखोल्या, दर्जेदार बाके, पुस्तके आणि क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. शाळांमधून समता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश (पान २ वर)

## जिल्ह्यातील आर्थिक दुर्बल घटकातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी कलश सीड्स शिष्यवृत्ती योजना

### १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

कलश सीड्स फाउंडेशनतर्फे जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून यावर्षीही आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी एकूण १८ व्यावसायिक कोर्सेससाठी कलश सीड्स शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली असून, यासाठी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख १५ सप्टेंबर आहे.

दहावी किंवा बारावीची परीक्षा जालना जिल्ह्यातून दिलेली असावी आणि अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांच्या आत असावे ही, या योजनेची प्रमुख अट आहे. यावर्षी एमबीबीएस, इंजीनियरिंग, एम.टेक. आयसीटी जालना, सीए/ सीएस/आयसीडब्ल्यूए फाउंडेशन, सीए/सीएस/आयसीडब्ल्यूए प्रथम आणि द्वितीय वर्ष, एलएलबी (पाच वर्षाचा एकत्रित अभ्यासक्रम), बी.फार्मसी, बी.एस्सी. एग्रीकल्चर, बी.एस्सी. नर्सिंग, पॉलिटेक्निक आणि आयटीआय आदी १८ कोर्सेससाठी शिष्यवृत्ती योजना आहे. गेल्या ४ वर्षात १२०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळालेला असून, यावर्षी ३०० पेक्षा अधिक पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाणार आहे. ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांची निवड ही शैक्षणिक गुणवत्तेनुसार तसेच समितीमार्फत घेण्यात येणाऱ्या मुलाखती आणि प्रत्यक्ष घरभेटीच्या तपासणीनंतर केली जाणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी अधिकृतपणे जाहीर केली जाऊन विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.

अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख १५ सप्टेंबर आहे. पात्रता, निवडीचे निकष आणि अधिक माहितीसाठी जालना शहरातील व्यंकटेशनगरमधील जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात अथवा शिष्यवृत्ती योजनेचे प्रकल्प समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित (मो. ९४०४६०७५७५) व दिलीप केंद्रे (मो. ७०२०५१८७६८) यांच्याशी संपर्क साधून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन कलश सीड्सचे (पान २ वर)

## इस्कॉन श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हा : रास गोविंद प्रभू



**जालना । प्रतिनिधी**

अंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन)च्या वतीने जालना शहरातील गंगाधरवाडी परिसरातील इस्कॉन मंदिरात यंदाही श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर आणि शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. या महामहोत्सवात शहरासह जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रीकृष्ण भक्तीचा आनंद घ्यावा, असे आवाहन मंदिर प्रमुख रास गोविंद प्रभू आणि इस्कॉन युवा कल्याण केंद्राचे अध्यक्ष तथा उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी केले आहे.

सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) गंगाधरवाडी परिसरातील इस्कॉन मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवाच्या नियोजनासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी युवक कल्याण मंडळाचे उपाध्यक्ष तथा उद्योजक कमलबाबू झुनझुनवाला यांच्या उपस्थितीत श्रीकृष्ण जन्माष्टमी-२०२६ समितीच्या पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. महोत्सवाचे नियोजन, भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन तसेच विविध (पान २ वर)

## जालना शहरातील दलित तरुणावर झालेल्या अमानुष मारहाणी प्रकरणी कठोर कारवाईची खासदार डॉ. कल्याण काळे यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील कन्हय्यानगर परिसरात परमेश्वर सुहास हिवाळे या दलित तरुणावर झालेल्या अमानुष मारहाणीच्या घटनेचा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तीव्र निषेध व्यक्त केला असून, या प्रकरणातील सर्व दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जिल्हा पोलिस प्रशासनाकडे केली आहे.



२३ मे २०२६ रोजी घडलेल्या या घटनेत संबंधित तरुणाला त्याच्या अल्पवयीन मुलासमोर सार्वजनिक ठिकाणी बेदम मारहाण करून त्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्यात आला. या प्रकारामुळे पीडिताच्या मानवी प्रतिष्ठेला धक्का पोहोचला असून संपूर्ण समाजात संतापाची भावना निर्माण झाली आहे.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींवर कठोर गुन्हे दाखल करण्यात यावेत. पीडित युवक व त्याच्या कुटुंबाला आवश्यक ती सुरक्षा, न्याय आणि मानसिक आधार उपलब्ध करून देण्याचीही त्यांनी मागणी केली आहे.

यासोबतच, समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आणि कायदा-सुव्यवस्था बिघडविणाऱ्या प्रवृत्तींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. अशा घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडत असून प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि ठोसपणे कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्हा पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व वेगवान चौकशी करून दोषींना तातडीने अटक करावी तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम मागणी केली आहे.यावेळी राजेंद्र राख,बदरभाई चाऊस,ज्ञानेश्वर भांदरगे,संजय इंगळे, संजय मुथा,सुनील चौधरी, अशोक उबाळे,राजेंद्र गोरे,राजाभाऊ कुलकर्णी,रऊफ परसूवाले,कृष्णा पा.पडूळ,राम (पान २ वर)

## 'अंधाराला गुरू मानले जाते... इतक्यासाठीच सूर्य लपवला जातो!'

### अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त नागसेन ग्रंथालयातील कवीसंमेलनात कवितांचा प्रखर हुंकार

**जालना । प्रतिनिधी**

''अंधाराला गुरू मानले जाते... इतक्यासाठीच सूर्य लपवला जातो!'' या व्यवस्थेच्या काळोख्या प्रवृत्तींवर प्रहार करणाऱ्या ओळींपासून ते ''वंचित माणसाला संधी मिळेल केव्हा?'' या अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नापर्यंत आणि ''जेव्हा सत्तेला संवादापेक्षा शस्त्र अधिक प्रिय वाटते...'' या लोकशाहीच्या सद्यस्थितीवर भाष्य करणाऱ्या कवितांपर्यंत विविध सामाजिक, मानवी आणि परिवर्तनवादी आशयाच्या रचनांनी नागसेन ग्रंथालयातील कवीसंमेलनात वैचारिक वातावरण भारावून गेले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कवीसंमेलनातून सामाजिक विषमता, समता, सामाजिक न्याय, स्त्रीस्वातंत्र्य, शेतकरी प्रश्न, बदलती सामाजिक मूल्ये आणि माणुसकीचा आवाज प्रभावीपणे उमटला.



नागसेन ग्रंथालय, जालना आणि मुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रविवारी सायंकाळी नागसेन ग्रंथालयात अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त विशेष कवीसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. साहित्यिक, कवी, सामाजिक कार्यकर्ते आणि साहित्यप्रेमींच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कवीसंमेलनात विविध कवींनी आपल्या कवितांमधून समाजातील वास्तवाचे अनेक पैलू मांडले. मनोरंजनासोबतच आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या आणि सामाजिक प्रश्नांना भिडणाऱ्या कवितांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

कवीसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रभाकर शेळके होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक सुरेश साबळे, ज्येष्ठ समाजसेवक रमेश देहेडकर, प्राचार्य प्रा. राजकुमार म्हस्के तसेच मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे मार्गदर्शक सुधाकर वाहुळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागसेन ग्रंथालयाचे अध्यक्ष राजेश राऊत यांनी केले. यावेळी सुरेश साबळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पंढरीनाथ सारके व सुहास पोतदार यांनी केले, तर कवीसंमेलनाचे संयोजन मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा कवी कैलास भाले यांनी केले.

कवी गणेश खरात यांनी आपल्या कवितेतून सामाजिक विषमतेचा प्रश्न थेट उपस्थित केला. ''वंचित माणसाला संधी मिळेल केव्हा, जगण्यातली विषमता सांगा मिटेल केव्हा...'' या आशयातून त्यांनी समाजातील दुर्लक्षित आणि वंचित घटकांच्या जगण्यातील संघर्षाला शब्द दिले. संधी, समानता आणि सामाजिक न्याय यांची केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष जीवनात त्याची अंमलबजावणी कधी होणार, असा प्रश्न त्यांच्या कवितेतून उपस्थित करण्यात आला.

डॉ. सुहास सदावर्ते यांनी दिवंगत ज्येष्ठ चित्रकार श्रीधर अंभोरे यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणारी भावस्पर्शी रचना सादर केली. ''सहा दशकांच्या प्रवासात व्यवस्थेने नाकारलेल्या माणसांचा चेहरा आपण रंग आणि कुंचल्यांत शोधत राहिलात...'' या आशयातून त्यांनी श्रीधर अंभोरे यांच्या कलाप्रवासाला आणि वंचितांच्या वेदना कलाकृतीतून मांडण्याच्या त्यांच्या भूमिकेला अभिवादन केले. या कवितेने उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

डॉ. गणेश कंटूले यांनी सूर्य, आभाळ आणि रंगांच्या प्रतीकांचा प्रभावी वापर करत समाजातील विषमता आणि भेदभावाच्या प्रवृत्तींवर भाष्य केले. ''सूर्याला सांग ना उदय नि अस्ताला कशाला सजवतोस केसरीने अंग... आभाळालाही ठणकावून सांग, कशाला सगळीकडे मिरवतोस तुझी निळाई...'' या ओळींमधून त्यांनी रंगांच्या आधारे समाजात श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना रुजविणाऱ्या प्रवृत्तींवर प्रहार केला. प्रतीकात्मक आशयामुळे ही कविता विशेष लक्षवेधी ठरली.

डॉ. राज रणधीर यांनी व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर आणि इतिहासाच्या विकृतीकरणावर धारदार भाष्य करणारी कविता सादर केली.

''संपवण्याचा डाव आखला जातो,
पुन्हा पुन्हा इतिहास बदलला जातो;
इंद्रधनू म्हातारे झाले आहे, आता नुसता रंग शिकवला जातो...
अंधाराला गुरू मानले जाते,
इतक्यासाठीच सूर्य लपवला जातो...''

या ओळींमधून इतिहास, विचार, सत्य आणि सामाजिक वास्तव यांच्यावर पडणाऱ्या पडद्याविषयी त्यांनी सवाल उपस्थित केला. कवितेतील उपरोध आणि (पान २ वर)

## जिल्ह्यात साखरेच्या घाऊक उपभोक्तासाठी साखर साठवून ठेवण्यावर मर्यादा

**जालना - प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय, अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी "Sugar (Stockholding Limit of Bulk Consumers) Order, २०२६'' निर्गमित केला आहे. हा आदेश १ सप्टेंबर २०२६ ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत लागू राहणार आहे.

या आदेशानुसार दरमहा १० मे.टन किंवा त्यापेक्षा अधिक साखर वापरणाऱ्या घाऊक उपभोक्ता कडे १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी साखरेचा साठा ठेवता येणार नाही. घाऊक उपभोक्ता मध्ये कन्फेक्शनरी उत्पादक, शीतपेय उत्पादक, अन्न प्रक्रिया उद्योग, मिठाई विक्रेते तसेच मागील एका वर्षातील चालू महिन्याव्यतिरिक्त कालावधीचा विचार करता दरमहा किमान १० मे. टन साखर वापरणारे अन्य संस्थात्मक खरेदीदार



यांचा समावेश आहे. साखर कारखान्यांकडून घाऊक उपभोक्ता ला थेट अथवा दलालामार्फत करण्यात येणाऱ्या साखर विक्रीची मासिक मात्रा संबंधित विक्रेता/खरेदीदाराने दाखल केलेल्या च्या आधारे पडताळण्यात येईल.

जिल्ह्यातील सर्व साखर व्यापारी, घाऊक विक्रेते, घाऊक उपभोक्ता तसेच संबंधित साखर कारखान्यांना केंद्र शासनाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सुचना आहे. सर्व संबंधितांनी केंद्र शासनाच्या आदेशातील साखर साठा मर्यादेचे पालन करून प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात येत आहे.

# संपादकीय...

## बैठका झाल्या, सूचना झाल्या; आता जालन्याला प्रत्यक्ष काम दिसणार का?

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी हे जालना शहरासाठी केवळ धार्मिक सण नाहीत, तर या काळात शहराच्या सार्वजनिक व्यवस्थेची खरी परीक्षा पाहणारे दिवस आहेत. बाजारपेठांमध्ये वाढणारी गर्दी, गणेश मंडळांचे कार्यक्रम, मिरवणुका, विसर्जनासाठी होणारी नागरिकांची वर्दळ आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारी लगबग यामुळे महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागावर अतिरिक्त जबाबदारी येते. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने आढावा बैठक घेऊन स्वच्छता, रस्ते, पथदिवे, मोकाट जनावरे, नाल्यांवरील ढापे, आरोग्य व्यवस्था आणि विसर्जनस्थळांच्या तयारीबाबत सूचना दिल्या आहेत. कागदावर पाहता नियोजन चांगले दिसते. मात्र, नागरिकांना बैठकीचे इतिवृत्त नको आहे; त्यांना रस्त्यावर बदल दिसायला हवा. हीच या बैठकीची खरी कसोटी आहे.

शहरातील रस्त्यांवरील खड्डे, बंद पथदिवे, नाल्यांवरील तुटलेले ढापे, मोकाट जनावरे आणि अस्वच्छता हे प्रश्न गणेशोत्सवाच्या काही दिवस आधी निर्माण झालेले नाहीत. हे प्रश्न नागरिकांना अनेक दिवसांपासून भेडसावत आहेत. मग सण जवळ आल्यानंतरच या प्रश्नांची स्वतंत्रपणे दखल घेण्याची वेळ का येते? महानगरपालिकेने वर्षभर नियमित पद्धतीने या मूलभूत सुविधांची देखभाल केली, तर सणांच्या काही दिवस आधी प्रशासनाला अचानक मोठी धावपळ करण्याची गरज भासणार नाही. सण हे प्रशासनासाठी 'डेडलाइन' नसून नियमित व्यवस्थापनाची संधी असायला हवी. पावसाळ्यात शहरातील रस्त्यांची अवस्था बिकट होते. खड्डे बुजविण्याच्या सूचना दरवर्षी दिल्या जातात. काही ठिकाणी खड्डे बुजविलेही जातात. मात्र, त्यानंतर काही दिवसांत पुन्हा रस्ता उखडला तर त्या कामाच्या गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होतो. गणेश मिरवणुकीचे मार्ग आणि विसर्जनस्थळाकडे जाणारे रस्ते विशेष महत्त्वाचे आहेत. या मार्गांवर केवळ वरवरची डागडुजी करून चालणार नाही. रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी, कामाची गुणवत्ता आणि पावसात टिकणारी दुरुस्ती याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. नाहीतर खड्डा बुजविण्याचा खर्च आणि पुन्हा खड्डा पडण्याचा खर्चदोन्ही नागरिकांच्या पैशातूनच का? शहरातील बंद पथदिवे हा केवळ प्रकाशाचा प्रश्न नाही. रात्रीच्या वेळी अंधारामुळे अपघात, चोरी, महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न आणि नागरिकांच्या हालचालींवर परिणाम होऊ शकतो. सणांच्या काळात रात्रीची वर्दळ वाढणार हे प्रशासनाला माहीत आहे. त्यामुळे कोणता पथदिवा बंद आहे याची तक्रार आल्यानंतर दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण शहराचे प्री-फेस्टिव्हल लाईटिंग ऑडिट करणे अधिक योग्य ठरेल. प्रमुख चौक, बाजारपेठा, धार्मिक स्थळांकडे जाणारे मार्ग, मिरवणुकीचे मार्ग आणि विसर्जनस्थळ परिसर पूर्णपणे प्रकाशमान असणे आवश्यक आहे. मोकाट जनावरे आणि कुत्र्यांचा प्रश्नही बैठकीत चर्चेला आला. मात्र, या समस्येवर अधूनमधून मोहीम राबविण्यापेक्षा कायमस्वरूपी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे. सणांच्या काळात रस्त्यांवर गर्दी वाढते. अचानक रस्त्यावर आलेले जनावर, कुत्र्यांचा कळप किंवा वाहनांच्या मध्ये धावणारे प्राणी अपघाताचे कारण ठरू शकतात. त्यामुळे 'कारवाई केली जाईल' या घोषणेऐवजी किती जनावरे पकडली, कुठे नेली, व्यवस्था किती दिवस टिकली आणि पुन्हा तीच समस्या निर्माण झाली का, याचा हिशेबही सार्वजनिक झाला पाहिजे. गणेश विसर्जनस्थळ हा या संपूर्ण नियोजनातील सर्वांत संवेदनशील भाग आहे. हजारो भाविक एकाच वेळी तेथे दाखल होऊ शकतात. अशावेळी स्वच्छता आणि सुशोभीकरणापेक्षा सुरक्षितता प्रथम असली पाहिजे.

कुंडाभोवती बॅरिकेडिंग, प्रकाशयोजना, सुरक्षित प्रवेश व निर्गमन मार्ग, प्रशिक्षित कर्मचारी, स्वयंसेवक, प्रथमोपचार केंद्र, अग्निशमन दल आणि आपत्कालीन बचाव व्यवस्था यांचा समन्वय असणे गरजेचे आहे. विशेष म्हणजे विसर्जनस्थळाची व्यवस्था शेवटच्या दोन-चार दिवसांत उभी करून भागणार नाही. गर्दीचा अंदाज, वाहतूक आराखडा आणि आपत्कालीन परिस्थितीची पूर्वतयारी आधीच करून ठेवावी लागेल. दुर्घटना झाल्यानंतर बचावकार्य करण्यापेक्षा दुर्घटना होऊ नये यासाठी नियोजन करणे ही खरी प्रशासनिक क्षमता आहे. या बैठकीत १८ ऑगस्टच्या बैठकीत दिलेल्या सूचनांपैकी किती कामे पूर्ण झाली आणि किती प्रलंबित आहेत, याचा आढावा घेण्यात आला. ही बाब सकारात्मक आहे. पण पुढचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहेया प्रगती अहवालाचे परिणाम नागरिकांना दिसणार कधी?

किती खड्डे बुजले?
किती पथदिवे दुरुस्त झाले?
किती मोकाट जनावरे हटविण्यात आली?
किती नाल्यांवरील ढापे दुरुस्त झाले?
विसर्जनस्थळाची किती कामे पूर्ण झाली?
आरोग्य पथके कुठे तैनात राहणार?
गर्दीच्या ठिकाणी कोणत्या विभागाची जबाबदारी राहणार?

या प्रश्नांची मोजता येणारी उत्तरे असतील तरच आढावा बैठकीला अर्थ प्राप्त होईल.

महानगरपालिकेच्या बैठकीत अधिकारी उपस्थित राहतात, सूचना दिल्या जातात, जबाबदाऱ्या निश्चित होतात आणि अहवाल मागविला जातो. ही प्रशासकीय प्रक्रिया आवश्यक आहे. मात्र, तिचा अंतिम परिणाम शहराच्या रस्त्यावर, चौकात, बाजारात आणि विसर्जनस्थळी दिसला पाहिजे. नागरिकांच्या दृष्टीने प्रश्न अगदी साधा आहे

रस्ता सुरक्षित आहे का?
रात्री प्रकाश आहे का?
कचरा वेळेवर उचलला जातोय का?
मोकाट जनावरांचा धोका कमी झाला आहे का?
विसर्जनस्थळी सुरक्षित व्यवस्था आहे का?

या प्रश्नांची उत्तरे 'होय' असतील, तरच मनपाचे नियोजन यशस्वी म्हणता येईल. सणांच्या काळात प्रशासनाने विभागनिहाय अधिकारी नियुक्त करून त्यांच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक आहे. केवळ कार्यालयातून अहवाल मागविण्याऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रात्रीच्या वेळी शहराची पाहणी केली तर अनेक समस्या कागदावर येण्यापूर्वीच दिसतील.

# चवीच्या मोहात आरोग्याचा विसर



आजकाल घराबाहेर पडले, की प्रत्येक चौकात खाद्यपदार्थांचा वास जिभेला भुरळ पाडतो. मग ते तळलेले वडापाव, चटकदार पाणीपुरी, रंगीबेरंगी ज्यूस, आकर्षक मिठाया, चमचमीत बिर्याणी, मसालेदार चायनीज असो की गरमागरम समोसे... चव जिभेवर रेंगाळते आणि आपण क्षणाचाही विचार न करता ते पदार्थ खायला जातो. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या फूड व्हिडीओंनी तर या सवयीला अधिक खतपाणी घातले आहे. पण या चमचमीत पदार्थांच्या मागे लपलेले वास्तव मात्र अंगावर काटा आणणारे आहे. आज महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांमुळे हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यभरात बनावट तूप, कृत्रिम पनीर, भेसळयुक्त मसाले, निकृष्ट तेल, कालबाह्य अन्नपदार्थ, दूषित मिठाई आणि दूध यावर सातत्याने धाडी टाकल्या जात आहेत. अनेक कारखाने सील करण्यात आले, परवाने रद्द झाले, गुन्हे दाखल झाले. या कारवायांनी एक गोष्ट स्पष्ट केली, आपल्या ताटापर्यंत पोहोचणाऱ्या अन्नाचा प्रवास जितका मोठा, तितकाच त्यात भेसळीचा धोका अधिक. याच पार्श्वभूमीवर अभिनेता श्रेयस तळपडे यांची 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेली मुलाखत अत्यंत बोलकी आहे. त्यांनी या मुलाखतीत एक प्रश्न विचारला, तुमच्या थाळीतील अन्न खरोखरच सुरक्षित आहे का? हा प्रश्न केवळ चित्रपटाचा प्रचार नाही, तर समाजाला जागे करणारा इशारा आहे. श्रेयस तळपदे सांगतो की, या चित्रपटाची पटकथा वाचल्यानंतर थोडा धक्काच बसला. अन्नभेसळीमुळे लोकांचे जीव जाऊ शकतात, कर्करोगासारखे गंभीर आजार होऊ शकतात, हे समजल्यावर त्यांनी हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, आज घरचे अन्न खा, असे आपण म्हणतो; पण घरात येणारे तांदूळ, डाळी, तेल, दूध आणि मसालेच भेसळयुक्त असतील, तर घरचे अन्नही किती सुरक्षित आहे? हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. श्रेयस तळपदे यांनी आणखी एक मुद्दा मांडला तो म्हणजे, आज ऑर्गॅनिक किंवा सेंद्रिय अन्नाच्या नावाखाली महागडी उत्पादने विकली जात आहेत. पण ती सामान्य माणसाच्या आवाक्यात आहेत का? जर सुरक्षित अन्न खाण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत असतील, तर गरीब आणि मध्यमवर्गीयांनी काय करावे? सुरक्षित अन्न हा श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. आज परिस्थिती अशी आहे की, बाजारात मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूकडे संशयाने पाहावे लागते. दूध भेसळयुक्त तर नाही ना? तूप शुद्ध आहे का? मिठाईतील रंग आरोग्यास अपायकारक तर नाहीत? फळे कृत्रिमरीत्या पिकवली आहेत का? भाज्यांवर धोकादायक रसायनांचा मारा झाला आहे का? या प्रश्नांची उत्तरे सामान्य ग्राहकाकडे नसतात. अलीकडे आपल्या वाचनात अन्नभेसळ केलेल्या अनेक बातम्या समोर येत आहेत. प्रसिद्ध हॉटेलांमधील अन्नात अळ्या किंवा पाली आढळणे, ताकात माशी, मिठायांमध्ये किडे दिसणे, फ्रीजमध्ये कुजलेले मांस सापडणे, भाजीपाला डबक्यात धुणे, रस्त्यावरील खाद्यपदार्थांसाठी अत्यंत अस्वच्छ पाण्याचा वापर होत असल्याचे उघड झाले. यामध्ये केवळ विक्रेत्यांची चूक नाही.

तर ग्राहक म्हणून आपणही अनेकदा निष्काळजीपणा करतो. स्वस्तात मिळते, चविष्ट वाटते म्हणून किंवा सोशल मीडियावर प्रसिद्ध आहे म्हणून आपण कोणत्याही ठिकाणी खायला जातो. स्वच्छता, परवाना, अन्नाचा दर्जा, वापरलेले तेल, साठवणूक याचा विचार फार कमी लोक करतात. दरम्यान, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी केलेले एक विधानही विचार करायला लावणारे आहे. त्यांनी काही वसतिगृहांच्या पाहणीत विद्यार्थी जेवणासोबत ड्रग्ज आणि मद्यही मागवत असल्याचा दावा केला. या विधानावर राजकीय वाद झाला; परंतु त्या विधानामागील मूळ संदेश वेगळा आहे. आजच्या तरुणांच्या खाण्याच्या सवयी झपाट्याने बदलत आहेत. पोषक आहारापेक्षा फास्टफूड, प्रक्रिया केलेले पदार्थ, ऊर्जा पेये आणि व्यसनांकडे झुकणारी जीवनशैली वाढत आहे. त्यातच भेसळयुक्त अन्नाची भर पडली, तर पुढील पिढीच्या आरोग्याचे चित्र किती भयावह असेल, याची कल्पनाही करवत नाही. अन्नभेसळ ही केवळ ग्राहकांची फसवणूक नाही; तर नफा कमावण्यासाठी एखादा व्यापारी हजारो लोकांच्या आरोग्याशी खेळत असेल, तर त्याला केवळ दंड करून चालणार नाही. तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी कारवाई करत आहेत, ही निश्चितच समाधानाची बाब आहे; पण ही मोहीम एखाद्या अधिकाऱ्यावर अवलंबून राहता कामा नये. ती संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी बनली पाहिजे. यासाठी सरकारने प्रत्येक जिल्ह्यात आधुनिक अन्न तपासणी प्रयोगशाळा उभारणे, नियमित तपासण्या करणे, दोषींवर कारवाई करणे आणि ग्राहकांना तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये आणि समाजमाध्यमांतून सुरक्षित अन्नाविषयी जनजागृतीही तितकीच महत्त्वाची आहे; परंतु शेवटी एक प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा, आपण आपल्या मुलांच्या हातात नेमके काय देत आहोत? त्यांच्या डब्यात पोषण आहे की रसायने? त्यांच्या आवडत्या चिप्समध्ये चव आहे की आरोग्याचा ऱ्हास? आपण बाहेरून आणलेला प्रत्येक घास त्यांच्या भविष्यातील आजारांचे कारण ठरत नाही तर ना? आज गरज आहे ती केवळ भेसळखोरांविरोधात कारवाईची नाही, तर चवीपेक्षा आरोग्याची निवड करणाऱ्या समाजाची. कारण आपल्या ताटातील प्रत्येक घास सुरक्षित असेल, तरच आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य निरोगी राहील.

पान १ वरुन...

### जालना जिल्ह्यातील...

शाळांच्या भिंतींवरील चित्रे व संदेश हे केवळ सजावटीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये समता, सामाजिक सलोखा, सर्वसमावेशकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारे असावेत. पंचतंत्रातील कथा, संत-महापुरुषांचे विचार, प्रेरणादायी प्रसंग आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या चित्रांचा समावेश करावा. स्थानिक संस्कृती आणि परिसराशी सुसंगत अशी बालस्नेही संकल्पना तयार करण्याच्या सूचना श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या.

शाळांमधील उपलब्ध मैदाने वापराविना पडून राहू नयेत. मैदानांवर मऊ लाल माती टाकून खो-खो, कबड्डी, मल्लखांब आणि बॅडमिंटनसारख्या खेळांसाठी किमान आवश्यक सुविधा निर्माण कराव्यात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी उपलब्ध क्रीडांगणांचा नियमित वापर होईल, याचे नियोजन करावे. तसेच शाळांमध्ये तंबाखू अथवा मद्याचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईसाठी जिल्हा परिषदेने पथक तयार करून वेळोवेळी पाहणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

श्रीमती मुंडे म्हणाल्या की, आदर्श शाळेत विद्यार्थ्यांसाठी वाचनालय, किचन गार्डन, सुरक्षित हरित कुंपण, वृक्षारोपण, सीसीटीव्ही यंत्रणा आणि अखंडित वीजपुरवठा असावा. डिजिटल वर्गखोल्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शन आणि परस्परसंवादी शिक्षण घेता आले पाहिजे.

अंगणवाडी आणि जिल्हा परिषदेच्या शाळांना व्यावसायिक दराने वीजबिल आकारल्यास त्यांच्या मर्यादित अनुदानातून हा खर्च भागविणे कठीण होते. त्यामुळे अंगणवाडी आणि शैक्षणिक संस्थांसाठी स्वतंत्र अथवा सवलतीचा वीजदर लागू करण्यासंदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांना विनंती करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**नगरपालिका शाळांच्या सुधारणेचा आराखडा तयार करा**

जालना नगरपालिकेच्या १६ शाळा सध्या असून विद्यार्थी संख्येवर आधारित शाळांची संख्या निश्चित करावी. विद्यार्थीसंख्या, इमारतींची सद्यस्थिती, झोपडपट्टी व वंचित वस्त्यांची ठिकाणे आणि विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ या बाबींचा अभ्यास करून शाळांमध्ये सुधारणा करण्यासाठी आराखडा तयार करावा, अशा सूचनाही श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या.

**ग्रंथालयांमध्ये डिजिटल आणि संशोधन सुविधा**

जालना महानगरपालिकेच्या हद्दीत विकसित करण्यात येणारी ग्रंथालये पारंपरिक स्वरूपाची न ठेवता स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, संशोधक आणि नियमित वाचक यांच्या गरजांनुसार विकसित करावीत. स्वतंत्र अभ्यास कक्ष, मुक्त वाचन क्षेत्र, संगणक व लॅपटॉप सुविधा, दूरदर्शन संच, ऑनलाइन मार्गदर्शन आणि संशोधन विभागाचा त्यात समावेश असावा, असे त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या वतीने सुधारणा करण्यात येणाऱ्या उद्यानांची प्रलंबित निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. उद्यानांमध्ये वृक्षारोपण, धूळ व प्रदूषण कमी करणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकांसाठी आरोग्यदायी सुविधा निर्माण करण्यात यावे. सर्व प्रकल्पांचे डिझाईन, खर्च, निविदा प्रक्रिया आणि अंमलबजावणीचे वेळापत्रक निश्चित करून कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

**जालना रेशीम उत्पादनांसाठी वैशिष्ट्यपूर्ण डिझाईन**

जालनाई सिल्कच्या ब्रँडिंगसंदर्भात सादरीकरण करण्याचे निर्देश देऊन श्रीमती मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्ह्यातील जालनाई सिल्कच्या उत्पादनांना स्वतंत्र बाजारपेठीय ओळख मिळवून देण्यासाठी तीन ते पाच वैशिष्ट्यपूर्ण डिझाईन निश्चित करावीत. मोसंबी, स्थानिक दगडी जाळी व स्थापत्यशैली तसेच अजिंठा कलाशैलीपासून प्रेरित घटकांचा डिझाईनमध्ये वापर करण्याची शक्यता तपासावी. डिझाईनची संख्या मर्यादित ठेवून ती जालना जिल्ह्याची सहज ओळख बनतील, याकडे लक्ष द्यावे. यासाठी व्यावसायिक ब्रँडिंग सल्लागाराची मदत घेऊन उत्पादनांची गुणवत्ता, कच्चा माल, विणकामासाठी लागणारा कालावधी, कारागिरांची मजुरी, किंमत आणि विक्री व्यवस्था यांचा समावेश असलेला सविस्तर व्यवसाय आराखडा तयार करावा.

सुरुवातीच्या टप्प्यात मध्यमवर्गीय ग्राहकांना परवडणारी दर्जेदार उत्पादने बाजारात आणून ब्रँडवरील विश्वास निर्माण करावा. त्यानंतर उच्च मूल्याच्या उत्पादनांची स्वतंत्र श्रेणी विकसित करावी. उत्पादनांच्या किंमती ठरविताना विणकर आणि कारागिरांना योग्य मोबदला मिळेल, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

### जिल्ह्यातील आर्थिक...

चेअरमन सुरेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक समीर सुरेश अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा समीर अग्रवाल आणि जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, अध्यक्ष सुनील रायठ्ठा, सचिव सुरेश कुलकर्णी यांनी केले आहे.

### इस्कॉन श्रीकृष्ण...

सेवांचे नियोजन याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी सकाळी ५ ते ११ या वेळेत महोत्सवाच्या धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होणार आहे. यामध्ये मंगल आरती, हरे कृष्ण जप, शृंगार आरती आणि कृष्णकथा आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्यानंतर सायंकाळी ५ वाजेनंतर कीर्तन, श्रीकृष्णाचा अभिषेक, कृष्णकथा, नाटिका, नृत्य आणि भजन आदी भक्तिमय कार्यक्रम होणार आहेत.

श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रात्री विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ११.३० ते मध्यरात्री १२ वाजेपर्यंत महाआरती होणार असून यावेळी भगवान श्रीकृष्णाला ५६ व्यंजनांचा नैवेद्य अर्पण करण्यात येणार आहे. त्यामुळे जन्माष्टमीच्या दिवशी मंदिर परिसरात मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती राहण्याची शक्यता आहे.

शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता पुन्हा कीर्तनाच्या कार्यक्रमाने धार्मिक सोहळ्याला सुरुवात होणार आहे. यावेळी श्रील पाद प्रभू यांचे गुणगान, पुष्पांजली आणि आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार असून या कार्यक्रमाने दोन दिवसीय श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सवाची सांगता होणार आहे.

बैठकीत श्रीकृष्ण जन्माष्टमी-२०२६ समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. समितीच्या अध्यक्षपदी डॉ. विवेक केंद्रे, सचिवपदी डॉ. विनायक काकड, तर उपाध्यक्षपदी विनोद कुमावत आणि डॉ. राजेंद्र अंभोरे यांची निवड करण्यात आली आहे. गोविंद दत्त प्रभू यांच्याकडे कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

समितीमध्ये कन्हैया खेरुडकर आणि डॉ. मीत अग्रवाल यांचा समावेश असून सदस्य म्हणून डॉ. प्रदीप बैनाडे, दिनेश अग्रवाल आणि सतीश पालीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महोत्सव यशस्वी करण्यासाठी समितीच्या माध्यमातून विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात येणार असून भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येत आहे.

श्रीकृष्ण जन्माष्टमी हा वैष्णव परंपरेतील महत्त्वाचा धार्मिक उत्सव असून या दिवशी भगवान श्रीकृष्णाच्या जन्माचा उत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. इस्कॉनच्या माध्यमातून कीर्तन, कृष्णकथा, जप, अभिषेक, आरती, भजन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्रीकृष्णाच्या भक्तीचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येतो.

जालना शहरातील गंगाधरवाडी परिसरातील इस्कॉन मंदिरात दरवर्षी जन्माष्टमीच्या निमित्ताने मोठ्या उत्साहात कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाही दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम होणार असल्याने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता युवक, महिला, कुटुंबे आणि विविध वयोगटातील भाविकांना एकत्र आणणारा आध्यात्मिक सोहळा ठरावा, यासाठी आयोजन करण्यात येत असल्याचे रास गोविंद प्रभू यांनी सांगितले. जालना शहर व परिसरातील भाविकांनी कुटुंबीयांसह या महामहोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. बैठकीस इस्कॉन मंदिरातील भाविक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

### जालना शहरातील...

पा.सिरसाठ,ज्ञानेश्वर डुकरे,नारायण वाढेकर,वासिम शेख,सोपान तिरुखे, गणेश खरात, ज्ञानदेव इंगोले अर्जुन भांदरगे,योगीताताई धांडगे, रघुवीर गुढे, मुफस्सार कुरेशी,सुरज यलगंटवार,शेख शकील,अकिल सय्यद,अब्दुल रफिक,दिनेश सुराणा,चंद्रकांत रत्नपारखी,भाऊसाहेब लकडे,राम गव्हाणे,नूर महेमूद,कलीम भाई,वसीम खान,शेख खलील,भागवत घाटे,विक्रम चव्हाण,गणेश एखंडे,दिग्विजय धांडगे,शेख रियाझ,मोबीन खान यासह नागरिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

### 'अंधाराला गुरू...

धारदार शब्दांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

मनीष पाटील यांनी ''दिसत आहे आता चंद्रभागेचे गढूळ पाणी आणि वैष्णवांच्या गर्दीत मंदावलेले बासरीचे सूर...'' या आशयाची कविता सादर केली. नदीच्या प्रदूषणापासून ते बदलत्या अध्यात्मिक वातावरणापर्यंतच्या वास्तवाकडे त्यांनी लक्ष वेधले. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक वास्तव यातील विरोधाभास कवितेतून मांडत त्यांनी आत्मपरीक्षणाची गरज अधोरेखित केली. डॉ. दिगंबर दाते यांनी ''कुठवर पोचलो हे ताडून पाहण्यासाठी अधूनमधून मी जातो गावाकडे तेव्हा...'' या कवितेतून गावाशी असलेली भावनिक नाळ उलगडली. आधुनिक जीवनाच्या धावपळीतही माणसाच्या मनात जिवंत असलेले गाव, माती, माणसं आणि जुन्या आठवणींचा धागा त्यांनी कवितेतून पकडला.कवयित्री कांचन थोरवे यांनी ''माणसांनी माणसांसाठी वसवलेली गावे...'' ही कविता सादर करून माणूस आणि माणुसकीच्या नात्याचा वेध घेतला. सामाजिक सलोखा, परस्पर सहकार्य आणि माणुसकीचा आधार यांचे महत्त्व त्यांच्या कवितेतून अधोरेखित झाले.

कवी विनोद जैतमहाल यांनी स्त्रीस्वातंत्र्याचा प्रश्न थेट मांडत समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेवर प्रहार केला. ''सर्वधर्मीय, सर्व जातीय भारतीय पुरुषांनो, तुम्ही झाकता बायांना नखशिखांत बुरख्यात... रोखता त्यांच्या वाटा आणि शक्य तितकी कोंडी करता...'' या ओळींतून स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर विविध प्रकारची बंधने लादणाऱ्या मानसिकतेला त्यांनी जाब विचारला.

स्त्रीला समान अधिकार, स्वातंत्र्य आणि स्वतःच्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकार मिळणे आवश्यक असल्याचा आशय या कवितेतून प्रभावीपणे व्यक्त झाला. सामाजिक सुधारणेच्या प्रक्रियेत स्त्रीस्वातंत्र्य हा केंद्रस्थानी असलेला विषय असल्याचेही या रचनेतून अधोरेखित झाले. कवी विनोद काळे यांनी सत्तेच्या कार्यपद्धतीवर आणि लोकशाहीच्या सद्यस्थितीवर कठोर भाष्य केले. ''जेव्हा सत्तेला संवादापेक्षा शस्त्र अधिक प्रिय वाटते, तेव्हा लोकशाही जिवंत तर असते... पण तिचा आवाज 'अतिदक्षता विभागात' मृत्यूशी झुंजत असतो!'' या खरमरीत आशयाच्या कवितेतून त्यांनी सत्तेने संवादाचा मार्ग सोडल्यास लोकशाहीसमोर निर्माण होणाऱ्या धोक्यांकडे लक्ष वेधले.

लोकशाही केवळ निवडणुका आणि सत्तांतरापुरती मर्यादित नसून त्यामध्ये संवाद, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य, असहमतीचा आदर आणि सामान्य नागरिकाचा आवाज महत्त्वाचा असतो, हा संदेश त्यांच्या कवितेतून व्यक्त झाला.

या कवीसंमेलनात सामाजिक, मानवी, ग्रामीण, सांस्कृतिक, प्रेम, निसर्ग, परिवर्तन आणि समतेच्या विविध विषयांवर निमंत्रित कवींनी कविता सादर केल्या. डॉ. प्रभाकर शेळके, प्रा. अशोक खेडकर, सुरेश साबळे, सुनील लोणकर, शिवाजी तेलंगे, रेखा गतखणे, डॉ. बी. जी. श्रीरामे, कृष्णा कदम, संगीता चव्हाण, संजयकुमार सरदार, श्रीमंत ढवळे, चंद्रकांत बोर्डे, किशोर भालेराव, जिजा वाघ, दिनेश शेळके, सर्जेराव खरात, लक्ष्मीकांत दाभाडकर आणि दीपक मगर यांच्यासह इतर निमंत्रित कवींनीही आपल्या रचना सादर केल्या.

काही कवितांनी सामाजिक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले, काहींनी शेतकरी आणि ग्रामीण जीवनातील वास्तव मांडले, तर काही रचनांमधून निसर्ग, प्रेम, माणुसकी आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचा वेध घेण्यात आला. त्यामुळे संपूर्ण कवीसंमेलनाला वैचारिक आणि साहित्यिक रंगत प्राप्त झाली. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू असलेल्या श्रमिक, वंचित आणि उपेक्षित माणसाच्या प्रश्नांचे प्रतिबिंब या कवीसंमेलनातील अनेक कवितांमध्ये उमटले. त्यामुळे जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाला सामाजिक आशयाची जोड मिळाली. प्रत्येक कवीच्या रचनेनंतर उपस्थित साहित्यप्रेमींनी उत्स्फूर्त दाद देत कवींना प्रोत्साहन दिले.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, श्रमिक आणि उपेक्षित समाजघटकांच्या वेदनांना आवाज दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कवीसंमेलनातूनही सामाजिक विषमता, अन्याय, स्त्रीस्वातंत्र्य, लोकशाही, शेतकरी आणि माणुसकीच्या प्रश्नांवर निर्भीडपणे व्यक्त होणारा साहित्यिक आवाज ऐकायला मिळाला. त्यामुळे नागसेन ग्रंथालयातील हे कवीसंमेलन केवळ काव्यवाचनाचा कार्यक्रम न ठरता समाजाला प्रश्न विचारणारा आणि विचारांना चालना देणारा वैचारिक साहित्यिक सोहळा ठरला.

# महाराष्ट्रातून अंमली पदार्थाचे २०२९ पर्यंत समूळ उच्चाटन; नशामुक्त भारत अभियानात पुढचे पाऊल, सर्वसमावेशक धोरण

**मुंबई - प्रतिनिधी**

नशामुक्त भारत अभियानात महाराष्ट्र राज्याने पुढचे पाऊल टाकले आहे. २०२९ पर्यंत राज्यातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तयार करण्यात आलेले सर्वसमावेशक धोरण मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. व्यापक जनजागृती आणि अंमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असे हे धोरण असेल. यात शासनाच्या सर्वच विभागांचा सहभाग घेतला जाणार आहे. हे सर्वसमावेशक धोरण यशस्वी व्हावे यासाठी ग्राम पातळीपासून ते जिल्हा, विभाग आणि मंत्रालयीन स्तरापर्यंत जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे. नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. केंद्र शासनाने विविध केंद्रीय व राज्य शासनाच्या विभागांमध्ये समन्वय साधून २०२९ पर्यंत संपूर्ण देशातून अंमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय पातळीवर 'नशामुक्त भारत अभियान' प्रभावीपणे राबविले जात आहे. केंद्र शासनाच्या या धोरणाला गती देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्याला सन २०२९ पर्यंत पूर्णपणे अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी 'सर्वसमावेशक शासकीय दृष्टिकोन' असे धोरण तयार करण्यात आले आहे. याअंतर्गत राज्यातील अवैध अंमली पदार्थाच्या निर्मितीला कारणीभूत असणारी पिकांची शेती, लागवड, नैसर्गिक व सिंथेटिक अंमली पदार्थांचे उत्पादन - वाहतूक, विक्री व सेवनावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांना 'अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (एएनटीएफ)' यांच्याशी समन्वय साधून काम करावे लागणार आहे. यासाठी मंत्रालय स्तरावरून समन्वयासाठी प्रत्येक विभागाकडून उपसचिव दर्जाचा अधिकारी नोडल अधिकारी नियुक्त केला जाणार आहे. या धोरणाच्या अंलबजावणीसाठी विविध विभागांना कार्यवाहीचे मुद्दे ॲक्शन प्लॅन निश्चित करण्यात आला आहे. यात शालेय शिक्षणात पुढील शैक्षणिक वर्षापासून (२०२७) इयत्ता पाचवीपासून अंमली पदार्थाबाबत जनजागृतीबाबत किमान एक धडा समाविष्ट करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा ३ मध्ये अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी वाढीव गुण दिले जाणार आहेत. सर्व शैक्षणिक संस्थांचा परिसर ड्रग फ्री कॅम्पस ठेवण्याकरिता उच्च व तंत्रशिक्षण विभागाला कार्यवाही करावी लागणार आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियानातही वाढीव गुण दिले जाणार आहेत.

याशिवाय दरवर्षी २६ जून रोजी अंमली पदार्थमुक्त उत्कृष्ट जिल्हा म्हणून पुरस्कार घोषित केले जातील. यात त्या त्या जिल्ह्याची २ ऑक्टोबर ते ३० एप्रिल कालावधीतील या कामगिरीचे मूल्यमापन केले जाईल. या धोरणात अंमली पदार्थ नियंत्रणाकरीता प्रभावी अंमलबजावणी, अंमली पदार्थ पुरवठ्यात तीव्र घट करणे, अंमली पदार्थांच्या मागणीत प्रभावी घट करणे, व्यसनमुक्ती, उपचार व पुनर्वसन असे चार स्तंभ निश्चित करण्यात आले आहेत. अंमली पदार्थ नियंत्रणाकरिता प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारी गृह,परिवहन, बंदरे, विधि व न्याय या विभागांवर असेल. अंमली पदार्थांच्या पुरवठ्यास आळा घालण्याची जबाबदारी महसूल, कृषि, वन विभाग यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तर कृत्रिमरित्या निर्माण करण्यात येणाऱ्या अवैध अंमली पदार्थांबाबत अन्न व औषध प्रशासन विभाग, उद्योग विभाग यांना कारवाई करावी लागणार आहे. अंमली पदार्थांच्या मागणीत प्रभावी घट व्हावी या दृष्टीने शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण, क्रीडा विभाग, ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, कौशल्य व उद्योजकता, माहिती व जनसंपर्क विभाग यांना जबाबदारी देण्यात आली आहे. व्यसनमुक्ती व उपचार पुनर्वसनासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय, सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगर विकास तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्याकडे जबाबदारी राहील.

# सोलापूरातील जुना पुणे नाका ते बोरामणी नाका उन्नत मार्ग प्रकल्पाला गती

## वाहतूक गतिमान होणार; निकडीचा प्रकल्पाचा दर्जा

**सोलापूर - प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील जुना पुणे नाका ते बोरामणी नाक्यापर्यंतच्या चार पदरी उन्नत मार्गिकेस आवश्यक निकडीचा सार्वजनिक प्रकल्प म्हणून घोषित करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. प्रकल्पासाठी विविध शासकीय विभागाच्या जमिनी कोणताही भोगवटा मूल्य न आकारता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला हस्तांतरित होणार असल्यामुळे हा प्रकल्प गतीने पूर्ण होण्याचा मार्ग खुला झाला आहे.हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी निर्देश होते. त्यानुसार या प्रकल्पाच्या निकडीची आणि अनुषंगिक बाबींची पडताळणी करून, हा प्रस्ताव सादर करण्यात आला. त्याला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे सोलापूर शहर, जिल्ह्यांतील वाहतुकीसह, आंतरराज्यीय वाहतूक सुरळीत होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील सोलापूर शहरातून जाणारा जुना पुणे नाका ते बोरामणी नाका उन्नत मार्ग सोलापूर शहरातील आणि आंतरराज्य वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचा आहे. या मार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी जुना पुणे नाका ते बोरामणी नाका दरम्यान चार पदरी उन्नत मार्ग आणि आवश्यक तिथे सेवा रस्ता आणि पोच मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. या उन्नत मार्गामुळे सोलापूर शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत मिळणार आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आवश्यक असणारी बहुतांश जमीन राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ताब्यात आहे. सार्वजनिक हिताच्या महत्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी शासकीय जमीन संबंधित विभागाला वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्प आवश्यक निकडीचा सार्वजनिक म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर विविध शासकीय विभागांच्या ताब्यातील जमीन कोणताही भोगवटा मूल्य न आकारता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे वर्ग करण्यासही मान्यता देण्यात आली.

**प्रकल्पाबाबत माहिती**

प्रकल्पाची लांबी - ९.६६० किलोमीटर चार पदरी उन्नत मार्ग रॅम्प सहा, छोटे पुल तीन

किंमत १०२०.५० कोटी रुपये.

प्रकल्पामुळे होणारे फायदे - सोलापूर शहरातील वाहतूक कोंडीत घट होणार. राष्ट्रीय महामार्गावरील प्रवास आधिक सुरक्षित आणि जलद होणार.

# भायगव्हाण येथे राज्य रेशीम दिनानिमित्त शास्त्रज्ञ-शेतकरी संवाद कार्यशाळा संपन्न

## हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर रेशीम शेती शाश्वत उत्पन्नाचा प्रभावी पर्याय शास्त्रज्ञ अंकुश गाडगे

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य रेशीम दिनाचे औचित्य साधून घनसावंगी तालुक्यातील मौजे भायगव्हाण येथे १ सप्टेंबर २०२६ रोजी रेशीम उद्योगाच्या उन्नतीसाठी रेशीम तंत्रज्ञानाची जनजागृती या विषयावर एकदिवसीय शास्त्रज्ञ-शेतकरी संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय रेशीम मंडळ, संशोधन विस्तार केंद्र (औरंगाबाद) आणि रेशीम संचालनालय, जिल्हा रेशीम कार्यालय (जालना) यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ-बी श्री. अंकुश सुभाष गाडगे यांनी शेतकऱ्यांशी सविस्तर संवाद साधला. ते म्हणाले की, ''सध्याच्या बदलत्या हवामानात आणि अनिश्चित पावसाच्या काळात पारंपारिक पिकांना पूरक म्हणून रेशीम शेती हा एक उत्तम आणि शाश्वत उपजीविकेचा पर्याय ठरत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत आवश्यक आहे.'' त्यांनी तुती लागवडीसाठी योग्य जमिनीची निवड, सुधारित तुती जाती, बागेचे खत व पाणी व्यवस्थापन, कीड व रोगांचे एकात्मिक नियंत्रण, रेशीम कीटक संगोपनगृहाचे निर्जंतुकीकरण, दर्जेदार चॉकी अळ्यांचा वापर, तापमान व आर्द्रता व्यवस्थापन, प्रौढ अळी संगोपन, योग्य



माउंटेजचा वापर, दर्जेदार कोष उत्पादन आणि कोष विक्री व्यवस्थापन आदी विविध तंत्रज्ञानांची सविस्तर माहिती दिली. यशस्वी रेशीम पीक घेण्यासाठी या सर्व तंत्रज्ञानाचा एकात्मिक पद्धतीने अवलंब करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागातील युवकांनी केवळ पारंपरिक शेती किंवा नोकरीवर अवलंबून न राहता रेशीम शेतीकडे मुख्य उत्पन्नाचा स्रोत आणि कृषी-आधारित व्यवसाय म्हणून पाहावे, असे आवाहनही श्री. गाडगे यांनी केले. रेशीम शेतीमध्ये तुती लागवड, चॉकी संगोपन, रेशीम कीटक संगोपन, कोष उत्पादन, धागानिर्मिती आणि मूल्यवर्धित वस्तूंच्या निर्मितीपर्यंत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. युवक आणि महिलांच्या सहभागातून गावपातळीवर रेशीम उद्योगाची मजबूत मूल्यसाखळी विकसित होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी जिल्हा रेशीम कार्यालय, जालना येथील क्षेत्रीय सहाय्यक श्री. शरद जगताप यांनी राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली. त्यांनी सिल्क समग्र-२, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा/व्हीबीजीआरएएमजी) योजनेअंतर्गत तुती लागवड, सिंचन सुविधा, रेशीम कीटक संगोपनगृह, संगोपन साहित्य आणि इतर आवश्यक घटकांसाठी उपलब्ध आर्थिक सहाय्याबाबत मार्गदर्शन केले. पात्र शेतकऱ्यांनी संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी भायगव्हाणचे सरपंच श्री. सुनील कोरडे यांनी उपस्थित अधिकारी व शास्त्रज्ञांचे बहुमोल तांत्रिक मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. रेशीम शेतीच्या माध्यमातून गावातील शेतकऱ्यांचे आर्थिक भविष्य अधिक सक्षम करण्यासाठी ग्रामपंचायत, शेतकरी आणि रेशीम विभाग परस्पर समन्वयाने कार्य करतील, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच गावामध्ये रेशीम शेतीचा प्रसार करून तुती लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांनी रेशीम शेतीतील तांत्रिक अडचणी, आर्थिक सहाय्य, कीड व रोग व्यवस्थापन आणि कोष विक्री याबाबत प्रश्न विचारले. शास्त्रज्ञ व विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या शंकांचे निरसन केले. या शास्त्रज्ञशेतकरी संवादामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये रेशीम शेतीविषयी जागरूकता निर्माण झाली असून, गावातील युवक आणि शेतकऱ्यांनी रेशीम उद्योग स्वीकारण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद व्यक्त केला. या कार्यशाळेस गावातील प्रगतिशील शेतकरी, युवक, ग्रामस्थ तसेच रेशीम विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहिसर पूर्व येथील ट्रान्सपोर्ट हबच्या कामातील ब्लास्टिंगबाबत नियमांचे उल्लंघन झाल्यास कारवाई करा - पालकमंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई - प्रतिनिधी**

दहिसर पूर्व जकात नाका येथे होत असलेल्या ट्रान्सपोर्ट हबच्या कामादरम्यान होणाऱ्या ब्लास्टिंगमुळे परिसरातील इमारतींना तडे जाणे, ध्वनी प्रदूषण तसेच नागरिकांना होणाऱ्या त्रासाच्या तक्रारींची गंभीर दखल घेत, यापूर्वी नियमांचे उल्लंघन झाले असल्यास संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिले.

ट्रान्सपोर्ट हबच्या कामासंदर्भात पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयील दालनात झालेल्या बैठकीत आमदार प्रकाश सुर्वे, आमदार मनिषा चौधरी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता लवंगारे यांच्यासह पर्यावरण, पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ब्लास्टिंग करणाऱ्या कंपनीचे यापूर्वी आयआयटीमार्फत परीक्षण करण्यात आले असून, त्यांच्या सूचनेनुसार नियंत्रित पद्धतीने ब्लास्टिंग करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेकडून सांगण्यात आले. मात्र, निर्धारित वेळा व अन्य सुरक्षा अटींचे यापूर्वी उल्लंघन झाले असल्यास त्याची नोंद घेऊन संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी. तसेच अधिक सुरक्षित व प्रगत ब्लास्टिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबतही विचार करावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. ब्लास्टिंगमुळे इमारतींना झालेल्या नुकसानीच्या तक्रारींची तज्ज्ञांमार्फत तपासणी करून स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल तयार करावा. तसेच ब्लास्टिंगमुळे नुकसान झाल्याचे स्पष्ट झाल्यास संबंधितांकडून नुकसानभरपाईची कार्यवाही करावी, असेही पालकमंत्री ॲड शेलार यांनी सांगितले. ट्रान्सपोर्ट हबच्या कामातून निघणाऱ्या खनिज व गौण खनिजाच्या वाहतुकीबाबत आवश्यक परवानग्या, रॉयल्टी आणि मानक कार्यपद्धतीचे पालन होत आहे.

# वाहतूक कोंडीचा विळखा; सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेशिवाय पर्याय नाही!

रस्त्यांवरील वाढती वाहतूक कोंडी ही आजच्या शहरी जीवनातील सर्वांत गंभीर समस्यांपैकी एक बनली आहे. मुंबई असो, ठाणे, कल्याण, नवी मुंबई असो किंवा मुंबईला जोडणारे राज्य व राष्ट्रीय महामार्ग असोतबहुतेक प्रमुख मार्गांवर दिवसेंदिवस वाहतुकीचा ताण वाढताना दिसत आहे. दिवस असो वा रात्र, सकाळ असो वा संध्याकाळ, अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या दिसतात. पूर्वी शनिवार-रविवार, सण किंवा सलग सुट्ट्यांच्या काळात जाणवणारी वाहतूक कोंडी आता रोजच्या जीवनाचा भाग बनली आहे. ही परिस्थिती केवळ वाहनचालकांसाठी त्रासदायक नाही, तर शहराच्या अर्थव्यवस्थेवर, पर्यावरणावर आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनावरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वेळ वाया जातो. पूर्वी एखादा प्रवास एक ते दीड तासात पूर्ण होत असेल, तर आता त्याच प्रवासासाठी दोन ते तीन तास किंवा त्याहून अधिक वेळ लागत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. विशेषतः सकाळच्या आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहनांची गती अक्षरशः कासवाच्या गतीने होते. कामावर जाणारे कर्मचारी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्णालयात जाणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसह सर्वसामान्य नागरिकांना याचा मोठा फटका बसतो. वाहतूक कोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकांमुळे आपत्कालीन परिस्थितीत गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे वाहतूक कोंडी हा केवळ गैरसोयीचा विषय नसून तो सार्वजनिक सुरक्षेशीही संबंधित प्रश्न आहे.

**वाहनांची वाढती संख्या हे प्रमुख कारण**

वाहतूक कोंडी वाढण्यामागे अनेक कारणे आहेत; मात्र त्यातील प्रमुख कारण म्हणजे रस्त्यांवर वाढणारी वाहनांची संख्या. शहरांची लोकसंख्या वाढत आहे आणि त्याच वेळी दरवर्षी मोठ्या प्रमाणात नवीन वाहने रस्त्यावर येत आहेत. अनेक कुटुंबांकडे एकापेक्षा अधिक वाहने आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अपेक्षेप्रमाणे सक्षम नसल्याने खासगी वाहनांवर अवलंबित्व वाढत आहे. वाहनांची संख्या वाढत असताना रस्त्यांची क्षमता मात्र त्या प्रमाणात वाढत नाही. शहरांमध्ये उपलब्ध असलेली जागा मर्यादित आहे. त्यामुळे कितीही रस्ते रुंद केले, उड्डाणपूल बांधले किंवा नवीन मार्ग तयार केले तरी वाहनांची संख्या सातत्याने वाढत राहिली, तर काही काळाने पुन्हा वाहतूक कोंडी निर्माण होणारच. त्यामुळे केवळ रस्ते बांधणे हा वाहतूक कोंडीवरील कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही.

**उड्डाणपूल बांधले, पण कोंडी कायम**

वाहतूक सुरळीत करण्यासाठी शासन आणि प्रशासनाने विविध ठिकाणी उड्डाणपूल, भुयारी मार्ग, रस्ते रुंदीकरण आणि इतर पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत. हे प्रयत्न निश्चितच आवश्यक आहेत; परंतु अनेक ठिकाणी उड्डाणपूल ओलांडल्यानंतर पुन्हा वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. यावरून समस्या केवळ एखाद्या चौकाची किंवा एखाद्या रस्त्याची नसून संपूर्ण वाहतूक व्यवस्थेच्या नियोजनाशी संबंधित असल्याचे स्पष्ट होते. एका ठिकाणी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केलेला उपाय दुसऱ्या ठिकाणी वाहतुकीचा ताण वाढवतो का, याचाही विचार करणे आवश्यक आहे. शहरातील वाहतुकीचा एकात्मिक अभ्यास करून त्यानुसार नियोजन करणे गरजेचे आहे.

**पार्किंगची समस्या वाहतूक कोंडी वाढवते**

वाहतूक कोंडीबरोबरच शहरांमध्ये पार्किंगची समस्याही गंभीर होत आहे. वाहनतळांची संख्या आणि उपलब्ध जागा वाहनांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत अपुरी पडत आहे. परिणामी अनेक वाहनचालक रस्त्याच्या कडेला वाहने उभी करतात. काही ठिकाणी दुहेरी पार्किंगमुळे रस्त्याची उपलब्ध रुंदी आणखी कमी होते आणि वाहतुकीचा वेग मंदावतो. अनधिकृत पार्किंगविरोधात कारवाई आवश्यक असली, तरी केवळ दंडात्मक कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी नियोजित पार्किंग व्यवस्था, बहुमजली वाहनतळ, सार्वजनिक वाहनतळांची संख्या वाढवणे आणि उपलब्ध पार्किंग जागेचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. नवीन मोठ्या इमारती, व्यापारी संकुले आणि निवासी प्रकल्पांना मंजुरी देताना पार्किंगची पुरेशी व्यवस्था आहे की नाही, याकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे.

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची गरज**

वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन वारंवार केले जाते. मात्र नागरिकांना सार्वजनिक वाहतूक वापरण्यासाठी ती सोयीची, सुरक्षित, वेळेवर आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे.

बेस्ट, पीएमपीएमएल यांसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर मोठ्या संख्येने नागरिक अवलंबून आहेत. मात्र बससेवेची अपुरी संख्या, अनियमित वेळापत्रक, गर्दी, मार्गांचे अपुरे नियोजन किंवा प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींमुळे अनेक नागरिक खासगी वाहनांकडे वळतात. नागरिकांना वेळेवर आणि आरामदायी सेवा मिळाली तर ते स्वतःचे वाहन वापरण्याऐवजी सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देतील.

म्हणून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा दर्जा सुधारण्याची जबाबदारी केवळ संबंधित परिवहन संस्थांची नाही, तर शासनाचीही आहे. बसची संख्या वाढवणे, मार्गांचे पुनर्नियोजन करणे, वेळापत्रकात सुधारणा करणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आणि प्रवाशांसाठी सुरक्षित व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**बस, रेल्वे आणि इतर वाहतूक साधनांचा समन्वय हवा**

महानगरांतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केवळ बससेवा पुरेशी नाही. बस, उपनगरीय रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांमध्ये योग्य समन्वय निर्माण करणे आवश्यक आहे. एका वाहतूक साधनातून दुसऱ्या साधनाकडे प्रवाशांना सहजपणे जाता आले पाहिजे. स्थानकांजवळ बससेवा, पार्किंग, पादचारी मार्ग आणि इतर सुविधा उपलब्ध असतील तर सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढू शकतो. 'एकात्मिक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था' ही भविष्यातील शहरांसाठी अत्यावश्यक गरज आहे. नागरिकांना घरापासून कामाच्या ठिकाणापर्यंत सहज, सुरक्षित आणि वेळेवर पोहोचता आले पाहिजे. अशी व्यवस्था निर्माण झाली तर खासगी वाहनांवरील अवलंबित्व निश्चितच कमी होईल.

**वाहतूक नियोजनात दूरदृष्टी आवश्यक**

शहरांचा विस्तार वेगाने होत असताना वाहतूक व्यवस्थेचे नियोजन मात्र त्याच वेगाने होत नसेल, तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. नवीन वसाहती, मोठ्या निवासी संकुलांना, कार्यालयांना, व्यापारी केंद्रांना आणि इतर प्रकल्पांना परवानगी देताना त्या भागातील वाहतुकीवर होणारा परिणाम विचारात घेणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडीचे व्यवस्थापन करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचाही वापर वाढवायला हवा. सिग्नलचे वैज्ञानिक नियोजन, वाहतूक प्रवाहाचे डिजिटल निरीक्षण, रस्त्यांवरील अडथळ्यांवर त्वरित कारवाई आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी उपलब्ध आकडेवारीचा वापर यामुळे वाहतुकीचे नियोजन अधिक परिणामकारक होऊ शकते.

**नागरिकांचीही जबाबदारी**

वाहतूक कोंडीसाठी केवळ शासन आणि प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही. नागरिकांचीही तितकीच जबाबदारी आहे. वाहतूक नियमांचे पालन करणे, चुकीच्या पद्धतीने पार्किंग न करणे, अनावश्यकपणे खासगी वाहनांचा वापर टाळणे, शक्य असेल तेव्हा सार्वजनिक वाहतूक वापरणे आणि रस्त्यावर शिस्त पाळणे आवश्यक आहे. रस्ते हे सर्वांसाठी आहेत. प्रत्येक नागरिकाने वाहतूक शिस्त पाळली तर वाहतुकीचा प्रवाह अधिक सुरळीत होऊ शकतो. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रभावी कारवाई करण्याबरोबरच नागरिकांमध्ये वाहतूक शिस्तीबाबत सातत्याने जनजागृती करणेही गरजेचे आहे.

**कोंडी सोडविण्यासाठी दीर्घकालीन धोरण हवे**

वाहतूक कोंडीची समस्या एका दिवसात निर्माण झालेली नाही आणि ती एका दिवसात संपणारही नाही. त्यासाठी दीर्घकालीन, सर्वसमावेशक आणि शाश्वत वाहतूक धोरणाची आवश्यकता आहे. रस्ते, उड्डाणपूल, पार्किंग, सार्वजनिक वाहतूक, रेल्वे, मेट्रो, सिग्नल व्यवस्था आणि शहर नियोजन या सर्वांचा एकत्रित विचार करावा लागेल. शासनाने मोठमोठ्या प्रकल्पांवर खर्च करण्याबरोबरच विद्यमान सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या गुणवत्तेतही मोठी सुधारणा करावी. नागरिकांना स्वतःचे वाहन वापरण्यापेक्षा बस, रेल्वे किंवा मेट्रोने प्रवास करणे अधिक सोयीचे आणि वेळेची बचत करणारे वाटले पाहिजे. सार्वजनिक वाहतूक हा पर्याय नव्हे, तर शहराच्या वाहतूक व्यवस्थेचा कणा बनला पाहिजे.

शहरातील रस्त्यांवरील वाहनांची संख्या कमी करायची असेल, तर नागरिकांना पर्यायी आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून द्यावी लागेल. सार्वजनिक वाहतूक सक्षम झाली तर खासगी वाहनांचा वापर कमी होईल; खासगी वाहने कमी झाली तर रस्त्यांवरील ताण कमी होईल आणि वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवणे शक्य होईल. वाहतूक कोंडी ही नागरिकांच्या संयमाची परीक्षा घेणारी समस्या बनली आहे. नागरिकांचा वेळ, इंधन आणि पैसा वाया जाण्याबरोबरच प्रदूषणातही भर पडत आहे. त्यामुळे आता केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर समाधान मानून चालणार नाही. शासन आणि प्रशासनाने दूरदृष्टीने नियोजन करून ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. वाहतूक कोंडी रोखायची असेल तर रस्ते वाढवण्याबरोबरच सार्वजनिक वाहतूक वाढवावी लागेल. नागरिकांचा सार्वजनिक वाहतुकीवरील विश्वास पुन्हा निर्माण करावा लागेल. सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, योग्य पार्किंग नियोजन, शिस्तबद्ध वाहतूक आणि दूरदृष्टीपूर्ण शहर नियोजन यांच्या माध्यमातूनच वाहतूक कोंडीच्या विळख्यातून महानगरांची सुटका होऊ शकते.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# खासगी मालमत्तेचे संरक्षण: विकासकाच्या फायद्यासाठी रस्ता रुंदीकरणास उच्च न्यायालयाचा चाप

**जालना - प्रतिनिधी**

केवळ विकासकाच्या फायद्यासाठी किंवा लोकप्रतिनिधीच्या सांगण्यावरून नागरिकांच्या खासगी मालमत्तेत हस्तक्षेप करून रस्ता रुंदीकरणासारखी कारवाई करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. भांडुप येथील ६ दशकांहून अधिक जुन्या कारखान्याच्या जागेतून रस्ता बनवण्याचा मुंबई महानगरपालिकेचा प्रयत्न न्यायालयाने फेटाळून लावला असून, पालिकेने जारी केलेल्या नोटिसा रद्द केल्या आहेत. या निर्णयामुळे महानगरपालिकांच्या मनमानी कारभाराला मोठा लगाम बसला आहे.

प्रकरणाची हकीकत अशी की, न्यूकेम प्रॉडक्ट्स कॉर्पोरेशन या भागीदारी संस्थेची भांडुप (पश्चिम) येथील लेक रोडवर १९५७ पासून एक फॅक्टरी आहे. मुंबई महानगरपालिकेने आत्माराम भोईर मार्गाला गेमदेवी रोड आणि लेक रोडला जोडण्यासाठी रस्त्याची रुंदी ९.१५ मीटरवरून १२.२० मीटर करण्याचा प्रस्ताव ठेवला. या प्रस्तावामुळे न्यूकेमच्या फॅक्टरीचा मोठा भाग (प्लॅननुसार सी ते डी बिंदू दरम्यानचा) संपादित केला जाणार होता. यासाठी पालिकेने मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २९९ अन्वये ५ जुलै, २०२४ आणि १ एप्रिल, २०२५ रोजी नोटिसा बजावून जागा ताब्यात देण्यास सांगितले. या

नोटिसांना कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील दिन्यार माडोन यांनी न्यायालयाला सांगितले की, ज्या जागेवर रस्ता प्रस्तावित आहे, ती खासगी मालमत्ता असून १९५७ पासून कंपनीच्या ताब्यात आहे. तो सार्वजनिक रस्ता नाही. या जागेचे संपादन केल्यास कार्यरत कारखाना दुभंगला जाईल. कारखान्याचे स्टोअर्स, कामगारांचे कॅन्टीन, प्रशासकीय क्षेत्र आणि माल उतरवण्याची

जागा मुख्य कारखान्यापासून वेगळी होईल. तसेच, या जागेत गॅस पाईपलाईन आणि भूमिगत वीज केबल्स आहेत. केवळ एका विकासकाला (मार्शल डेव्हलपर) त्याच्या जागेसाठी दुसरा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी हा सर्व खटाटोप सुरू असून, ही कारवाई बेकायदेशीर आणि बदहेतूने प्रेरित आहे. दुसरीकडे, महानगरपालिकेच्या वतीने ज्येष्ठ वकील गिरीश गोडबोले यांनी सांगितले की, हा रस्ता विकास आराखड्याचा भाग आहे आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच कारवाई केली जात आहे. एका लोकप्रतिनिधीने नागरिकांच्या मागणीनुसार वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी या रस्त्याची मागणी केली होती. सार्वजनिक हित याचिकाकर्त्यांच्या खासगी हितापेक्षा मोठे आहे. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखाड यांच्या खंडपीठाने महानगरपालिकेची कारवाई चुकीची ठरवली. न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, ''संपादित केली जाणारी जागा ही १९५७ पासून

याचिकाकर्त्यांच्या ताब्यात असलेली खासगी मालमत्ता आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २९७ आणि २९९ अंतर्गत

खासगी मालमत्ता, जी सार्वजनिक रस्त्याचा भाग नाही, ताब्यात घेण्याचे अधिकार आयुक्तांना नाहीत, विशेषतः जेव्हा यामुळे एक सुरू

असलेला कारखाना विस्कळीत होत असेल. न्यायालयाने पुढे नमूद केले की, प्रस्तावित रस्त्यामुळे केवळ ४०० मीटरचे अंतर वाचणार आहे आणि सध्याचा रस्ता आधीच अतिक्रमणांनी व्यापलेला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याचा दावा फोल आहे. केवळ एका विकासकाच्या फायद्यासाठी आणि लोकप्रतिनिधीच्या पत्रावरून वैधानिक अधिकारांचा असा वापर करता येणार नाही, असे खडे बोल न्यायालयाने सुनावले. न्यायालयाने महानगरपालिकेने जारी केलेल्या दोन्ही नोटिसा रद्द केल्या.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ''उच्च न्यायालयाचा हा निकाल सर्व महानगरपालिकांसाठी एक धडा आहे. सार्वजनिक हिताच्या नावाखाली खासगी मालमत्तेवर गदा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांना हा मोठा दणका

आहे. जालना महानगरपालिकेनेही या निर्णयातून बोध घ्यावा. शहरात विकास आराखड्याच्या नावाखाली किंवा वाहतुकीचे कारण पुढे करून

खासगी मालमत्ता ताब्यात घेताना कायद्याचे पालन करणे आणि नागरिकांचे हित जपणे आवश्यक आहे. केवळ विकासक किंवा राजकीय दबावाखाली नागरिकांना वेठीस धरणे चुकीचे आहे. या निकालामुळे प्रशासनाच्या मनमानीला आळा बसेल आणि नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होईल.''

# दीपक रणनवरे यांच्या उपोषणाकडे जिल्हा प्रशासनाने फिरवली पाठ

**जालना - प्रतिनिधी**




ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी चार दिवसापासून अन्नत्याग उपोषणास बसलेले सामाजिक कार्यकर्ते दीपक रणनवरे यांच्या उपोषणाकडे जिल्हा प्रशासनाने पाठ फिरवली असल्याच्या भावना ब्राह्मण समाजाच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या आहेत.

ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी दीपक रणनवरे हे गेल्या चार दिवसापासून गांधी चमनवर अन्नत्याग उपोषणास बसले आहेत. त्यांच्या उपोषणास भेट देण्यासाठी विविध सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय पक्षाचे कार्यकर्ते उपोषणस्थळी येत असले तरी जालना जिल्हा प्रशासनाने दीपक रणनवरे यांच्या उपोषणाकडे पाठ फिरवली असल्याची भावना ब्राह्मण समाजातील कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत. शासनस्तरावर या उपोषणाची दखल घेतली गेली नसल्याने ब्राह्मण समाजात शासनाविषयी नाराजी पसरली असल्याची भावनाही ब्राह्मण समाजाने व्यक्त केली आहे. अन्नत्याग उपोषणामुळे दीपक रणनवरे यांची प्रकृती चिंताजनक होत असल्याने शासनाने त्यांच्या उपोषणाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

**अनेकांच्या उपोषणास भेटी**

दीपक रणनवरे यांच्या उपोषणाच्या आजच्या चौथ्या दिवशी उपमहापौर राजेश राऊत, मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती संध्या देठे, माजी नगरसेवक विजय पवार, विनायक महाराज फुलंब्रीकर, सामाजिक कार्यकर्ते रमेश देहेडकर, नगरसेवक कल्याण भदनेकर, सामाजिक नेते रविकांत जगधने, सचिन बर्गे, संदीप गायकवाड, संजय देठे, संदेश देशपांडे, सुनील बुनगे,अनंत महाराज देशपांडे, नंदकुमार काळे, मोहनराव मुळे, राजेंद्र राऊत, शरद काळे, सुरेश वानखेडे, देविदास पुंडे, अंकुश सुल्ताने, श्रीकांत सेलगावकर, सुनिता देशमुख, मुरलीधर दाभाडकर,गोकुळ मुंढे, दिलीप देशपांडे आदींनी भेट देऊन त्यांच्या उपोषणास पाठिंबा दिला.

दरम्यान, जालना तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांनी आज सकाळी उपोषणस्थळी भेट देऊन दीपक रणनवरे यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

# खाद्यतेल विक्रीला एक वर्ष मुदतवाढीचे जालना व्यापारी महासंघाकडून जल्लोषात स्वागत

**जालना - प्रतिनिधी**



राज्यात खुल्या (सुट्या) खाद्यतेल विक्रीवर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी घातलेल्या बंदीला राज्य शासनाने तात्पुरती स्थगिती देत एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. या निर्णयामुळे व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून जालना जिल्हा व्यापारी महासंघ आणि कॅटच्या वतीने या निर्णयाचे फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोषात स्वागत करण्यात आले.

अन्न व औषध प्रशासनाने अचानक सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर बंदी घातल्याने किरणा व तेल विक्रेत्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले होते. या निर्णयाविरोधात जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा कॅटचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी पुढाकार घेतला. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेलद्वारे निवेदन पाठवून व्यापाऱ्यांच्या अडचणी मांडल्या आणि या बंदीला मुदतवाढ देण्याची मागणी केली. राज्यभरातील व्यापारी संघटनांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला.

व्यापाऱ्यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुल्या खाद्यतेलाच्या विक्रीला एक वर्षाची मुदतवाढ जाहीर केली. या निर्णयाची माहिती मिळताच जालन्यातील होलसेल किराणा मार्केटमध्ये व्यापारी एकत्र आले. व्यापारी एकता जिंदाबादच्या घोषणा देत आणि फटाके फोडून व्यापाऱ्यांनी शासनाच्या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आणि यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल सतीश पंच यांना पेढा भरवून त्यांचा सत्कार केला. यावेळी ऑइल मिल असोसिएशनचे अध्यक्ष संजय शिनगारे, कपिल चावला, संजय राऊत, रवींद्र अग्रवाल, गोविंद सांखला, गोपाल काबरा, सत्यनारायण काबरा, निलेश नवपुते, रितेश तोष्णीवाल, चेतन रुणवाल, मनोज गडगिळे, अभिजीत मालपाणी, सचिन पंच, आनंद पंच, गोपाल झंवर यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक व्यापारी आणि महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील बारमाही रोजंदार मजुरांच्या प्रकरणाची सखोल तपासणी करा – कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई - प्रतिनिधी**

: डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील बारमाही रोजंदारी करणाऱ्या मजुरांना नियमित करण्याबाबत सर्व बाबी तपासून नियमानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

मंत्रालयात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील बारमाही रोजंदार मजुरांना अनुदानित असलेली पदे भरण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री भरणे बोलत होते. यावेळी कृषी विभागाच्या उपसचिव प्रतिभा पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील बारमाही रोजंदार मजूर पवन देशमुख, अनंतकुमार शिरसाठ यांच्यासह सदस्य उपस्थित होते. मंत्री भरणे म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील बारमाही रोजंदारी करणाऱ्या मजुरांची २०२५ मधील प्रचलित भरती प्रक्रिया, कर्मचारी योजना तसेच वेतन निश्चितीबाबत तपासणी करण्यात यावी. संबंधित प्रकरणाची सविस्तर चौकशी करून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. नियमित कर्मचारी तसेच कंत्राटी व मानधन तत्त्वावरील कर्मचाऱ्यांबाबत लागू असलेल्या नियमांची पडताळणी करून संबंधित नियुक्त्यांना सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी आहे किंवा नाही, याची तपासणी करण्यात यावी. या प्रकरणात संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून विभागीय चौकशी करण्यात यावी असे निर्देशही कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

**शिवसेना दलित आघाडीच्या जालना जिल्हा कार्यकारणीसह तालुका-शहर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तत्या**

# नियुक्तयांमुळे जिल्ह्यात शिवसेना दलित आघाडीची संघटनात्मक ताकद वाढणार - ॲड. भास्कर मगरे

**जालना - प्रतिनिधी**



शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष माजी आमदार रामभाऊ पंडागळे, जालना जिल्ह्याचे नेते आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या आदेशानुसार शिवसेना दलित आघाडीच्या जालना जिल्हा कार्यकारणीसह जिल्ह्यातील तालुका व शहर कार्य कारणीतील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तया करण्यात आली असल्याची माहिती शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे आयोजित केलेल्या बैठकीत दिली. शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांच्या अध्यक्षतेखाली या नियुक्तया जाहीर करण्यात आल्या. या माध्यमातून जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेची ध्येय-धोरणे व विचारधारा तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवून संघटना मजबूत करण्यासाठी सक्रियपणे कार्य करावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी केले.

जिल्हा कार्यकारणीत जिल्हा सचिवपदी जय खरात, तर जिल्हा कोषाध्यक्षपदी भगवान लहाने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच उपजिल्हाप्रमुखपदी अण्णासाहेब बाळराज, बाळासाहेब बदर्गे, दशरथ तांबे, प्रल्हाद साळवे, संभाजी फुफाटे, यशवंत गोफने,बाबुराव साबळे आणि किशोर मुनेमाणिक यांची नियुक्ती करण्यात आली.तालुका व शहर कार्यकारणीतही विविध पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जालना तालुकाप्रमुखपदी आकाश निकाळजे व हरिभाऊ कांबळे, तर जालना शहरप्रमुखपदी भोलाभाऊ कांबळे यांची नियुक्ती झाली आहे. घनसावंगी तालुकाप्रमुखपदी बाळासाहेब गाडेकर व विष्णु शिंदे, परतूर तालुकाप्रमुखपदी दिलीप पाटेकर व गोरख खरात, मंठा तालुकाप्रमुखपदी बाबुराव साबळे, अंबड तालुकाप्रमुखपदी विलासराव खरात व भाऊसाहेब पाचगे, बदनापूर तालुकाप्रमुखपदी बाबासाहेब बोबडे व नाना राजगिरे, भोकरदन तालुकाप्रमुखपदी संदीप काकडे व संजय घोरपडे, तसेच जाफराबाद तालुकाप्रमुखपदी विजय मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तयांमुळे जालना जिल्ह्यात शिवसेना दलित आघाडीची संघटनात्मक ताकद वाढण्यास मदत होणार असून, आगामी काळात तळागाळातील नागरिकांच्या प्रश्नांसाठी पदाधिकारी सक्रियपणे काम करतील, असा विश्वास शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी व्यक्त केला.

# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यांच्यामार्फत मुख्यमंत्री फडणवीस, जलसंपदा मंत्री विखे पाटील यांना निवेदन

**धाकलगाव - प्रतिनिधी**



अंबड तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी गेल्या २५ ते ३० वर्षांपासून गल्हाटी प्रकल्पासाठी उपसा सिंचन योजनेच्या मागणीसाठी समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते यांनी पुढाकार घेतला आहे. घनसावंगी तालुक्यातील गुंज व अंबड तालुक्यातील साष्ट पिंपळगाव उच्च पातळी बंधारे तसेच पाथरवाला बंधाऱ्यातून गल्हाटी मध्यम प्रकल्पात पाणी वळविण्याच्या २५ दलघमी पाणी योजनेला विशेष बाब म्हणून मान्यता देण्याची आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात मंगळवारी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. यावेळी गल्हाटी संघर्ष समितीचे अध्यक्ष राधाकिसन मैंद, उपाध्यक्ष पांडुरंग गटकळ, शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र छल्लारे, युवा नेते करण मिठे, मंगेश मुंढे, तान्हाजी धुमाळ, गोवर्धन वाघ, बाळू मुंढे, शंकर उंडे, शंकर पवळ, गोपाल रोटे, गंगाराम पवळ यांच्यासह मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील शेतकरी उपस्थित होते.

जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्याचा भाग जायकवाडी प्रकल्पाच्या कालव्याचा पुच्छ भाग असल्याने येथील लाभक्षेत्राला नियमित पाणी मिळत नाही. तसेच गल्हाटी मध्यम प्रकल्पात सातत्याने पाण्याची मोठी तूट निर्माण होत असल्याने परिसरातील शेती आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट बनला आहे. या पार्श्वभूमीवर सतीश घाटगे यांनी प्रशासकीय व कायदेशीर बाजू मांडत शासनाचे लक्ष वेधले आहे. नाशिक येथील जलविज्ञान व धरण सुरक्षितता विभागाच्या तांत्रिक अहवालानुसार खालील बाजूस असलेल्या लोणी सावंगी बंधाऱ्यावर कोणताही विपरीत परिणाम न होता ७५% विश्वासार्हतेने १२.००४ दलघमी नक्त येवा उपलब्ध आहे. त्यामुळे पश्चिम वाहिनीचे पाणी खोऱ्यात येईपर्यंत उपलब्ध पाण्याचा आधार घेऊन गुंज व साष्ट पिंपळगाव बंधाऱ्यांचे काम प्राधान्याने मार्गी लावावे, अशी भूमिका घाटगे यांनी मांडली.

सतीश घाटगे यांनी केलेल्या प्रमुख मागण्या:

नाशिक जलविज्ञान प्रमाणित १२.००४ दलघमी उपलब्ध पाण्यानुसार गुंज (८ दलघमी) आणि साष्ट पिंपळगाव (७ दलघमी) बंधाऱ्यांना अंतरिम मंजुरी द्यावी.

नाशिक कार्यालयाकडून अहवाल मागवून तिन्ही योजनांसाठी २५.०० दलघमी पाण्याला विशेष बाब म्हणून अंतिम मंजुरी द्यावी.

गल्हाटी प्रकल्पातील तुटीवर मात करण्यासाठी पाथरवाला बंधाऱ्यातून १० दलघमी पाणी उचलण्यास प्राधान्याने मंजुरी द्यावी. पश्चिम वाहिनीचे पाणी गोदावरी खोऱ्यात येताच तिन्ही प्रकल्पांना मूळ क्षमतेनुसार पूर्ण पाणीसाठा मंजूर करावा.

सर्व प्रकल्पांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे तातडीने आदेश द्यावेत. मंत्रालय, पाटबंधारे महामंडळ व नाशिक जलविज्ञान विभागाची तातडीने संयुक्त बैठक घेऊन प्रलंबित तांत्रिक बाबी मार्गी लावाव्यात.

# वलखेड येथे वादळी वाऱ्याने शेतकऱ्याच्या सोलर पॅनेलचे मोठे नुकसान

**परतूर - प्रतिनिधी**



परतूर तालुक्यातील शिवार वलखेड येथील शेतकरी अर्जुन नाथा फटिंग यांच्या शेतातील सोलर पंपाचे वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवार वलखेड येथे शेतकरी अर्जुन नाथा फटिंग यांचे गट नंबर ९६ मध्ये शेत आहे. त्यांनी शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत सोलर पंप बसवला होता. मात्र, परिसरामध्ये अचानक सुटलेल्या तीव्र वादळी वाऱ्यामुळे या सोलर पंपाच्या चार महत्त्वाच्या पाटी (सोलर प्लेट्स) उडून गेल्याने त्यांचे प्रचंड नुकसान झाले.या अचानक आलेल्या संकटामुळे शेतकरी अर्जुन फटिंग यांच्यासमोर पिकांना पाणी कसे द्यावे, असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आधीच संकटात असलेल्या शेतकऱ्यावर या निसर्गाच्या कोपामुळे दुहेरी आर्थिक भर पडली आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी व नागरिकांत हळहळ व्यक्त केली जात असून, संबंधित प्रशासनाने तात्काळ या नुकसानीचा पंचनामा करून पीडित शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत किंवा सोलर पॅनेल दुरुस्त करून द्यावे, अशी मागणी फटिंग व गावातील शेतकऱ्यांनी केली आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.